**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**प्रेस नोट दि.१५/०७/२०१९**

**दि.१४/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे २६२/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | राजेश ठाकुर,वय-४६,रा.६४७,बुधवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०७/२०१९ रोजी ०४/०० वा.ते दि.१४/०७/२०१९ रोजी ०४/०० वा.चे दरम्यान फ्लॅट नं. ८,साई संकुल अपार्टमेंट,६४७,बुधवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख ५ हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण १,२५,०००/- रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विजय जाधव ९८५०९७५९२० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ४१३/१९,भादविक ४०६,४२०,२०१,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३८ वर्षे,रा.प्रभात चौक,धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी मोटार सायकलस्वार व दोन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१५ ते माहे जुन २०१९ अखेर पर्यंत जयभवानी महिला बचतगट,भवानी पार्क,मंदार सोसायटीचे शेजारी,धनकवडी शेवटचा बसस्टॉप,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद दोन अनोळखी मोटार सायकलस्वार व दोन महिला यांनी संगनमत करून जयभवानी महिला बचत गट नावाने बचत गट काढुन,एकुण १० बचत गटांचे महिलांचा विश्वास संपादन करून,त्यांचेकडुन दरमहा २००/- रूपये प्रमाणे वर्गणी गोळा करून,सदर जमा झालेले पैसे बचत गटाचे बँक खात्यावर जमा न करता,सदर रकमेचा अपहार करून बचत गटांचे काही सभासद महिलांचे मुदत पुर्ण झालेनंतर देखील त्यांना ठरलेला परतावा न देता त्यांची फसवणुक करून,दोन अनोळखी इसमांचे मदतीने बचत गटांचे रेकॉर्ड कोणास काही न सांगता काढुन घेवुन,पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जी.एस.देव ९५११२०००६६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ४१४/१९,भादविक ४२०,४०६,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-६१ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | मु.रुळे,पोस्ट-पानशेत,ता.वेल्हा,जि.पुणे या गांवातील वृंदावन सहकारी फळबाग सोसायटीचे प्रशासकिय एकुण सहा सदस्य (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/१२/२०१६ रोजी ते आजपर्यंत फ्लॅट नं.४०,स.नं.६२,बी.पर्वती,पदमादर्शन सोसायटी,पुणे सातारा रोड,पर्वती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद वृंदावन सहकारी फळबाग सोसायटीचे प्रशासकिय एकुण सहा सदस्य यांनी संगनमत करून,फिर्यादी व साक्षीदार यांचेकडुन ६० लाख रुपये घेवुन,मु.रुळे पोस्ट पानशेत ता.वेल्हा,जि.पुणे येथील वृंदावन सहकारी फळबाग गट नं.४२४ ची ८६ गुंठा जमीन नावावर करुन देतो असे सांगुन,ते नावावर न करता त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. अश्विनी पाटील ७५१७४८२८२८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १६८/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२४,रा.एरंडवणे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०५/२०१९ रोजी ते दि.२४/०५/२०१९ रोजीचे कालावधीत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक इसमाने फिर्यादी यांना लोन देण्याचे बहाण्याने फोन करून,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून,त्यांना ५ लाख रूपयेचे नामांकीत कंपनीचे खात्यात वेग-वेगळे कारणे सांगुन,एकुण १,०६,५००/- रूपये भरण्यास भाग पाडुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. कल्पना जाधव ९९२३६९५५९५ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ३४३/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५५,रा.सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०६/२०१९ रोजी १४/३० वा. ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक इसमाने फिर्यादी यांना फोन करून,त्यांना त्यांची इंडीगो एअरलाईन्सचे लगेज परत करतो असे सांगुन,फिर्यादी यांचे बँकेचा क्रेडीट कार्ड व ओटीपी शेअर करण्यास सांगुन,फिर्यादी यांची ९५ हजार रूची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) राजेश सहाने ९०११८६११४८ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३३३/१९,भादविक ३०९ |
| **फिर्यादी** | जी.के.सकट, पोलीस हवालदार ३९०८,स्वारगेट पोलीस ठाणे,पुणे. |
| **आरोपी** | निलेश जयंतीलाल सुराणा,रा.३०४/बी,स्नेहगंगा सोसायटी,स्वारगेट,पुणे (ॲडमीट आहे) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०६/२०१९ रोजी २५०/३० वा.३०४/बी,स्नेहगंगा सोसायटी,स्वारगेट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम निलेश जयंतीलाल सुराणा याने त्याचे राहते घरी घरगुती वादाला कंटाळुन किटकनाशक मारण्याचे औषध प्राशन करुन,आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. एस.एन.शेख ९६८९९३४२८६ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ६४९/१९,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | श्रीमती.शोभा अवघडे,वय-३५,रा.भोईटेनगर,खडकी,पूणे |
| **आरोपी** | एकुण सात इसम व दोन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१० पासुन ते आजपर्यंत हडपसर तसेच खडकी येथे व लोणावळा अन्नपुर्णा लॉज येथे |
| **तपशिल** | यातील मयत निरंजन अवघडे व हडपसर येथील नमुद इसमापैकी एका इसमाने भागीदारीत व्यवसाय करून,त्याकरीता फिर्यादी यांना बँकेची कर्ज तसेच सावकारी कर्जे हे इसमाने घेण्यास भाग पाडून,त्यानंतर ते फेडण्यास तो व त्याचे कटुंबियांनी टाळाटाळ केली. तसेच इतर इसमांनी निरंज अवघडे यास वारंवार फोन करून,तु खोटे कागदपत्रे तयार करून कर्ज घेतले आहे असे सांगुन,पोलीस ठाण्यास तक्रार देतो अशा धमक्या देवून,त्याचेवर कारवाई न करणेकरीता वेळोवेळी २ लाख रूपये घेवुन,मानसिक त्रास देवुन,त्याचा मानसिक छळ केल्याने,त्या छळास कंटाळुन निरंजन अवघडे व त्याची पत्नी फिर्यादी हे सन २०१७ मधे बोपोडी,खडकी,पुणे येथे रहाण्यास गेले तरीही सदर इसमांनी संगनमत करून,निरंजन यांना वेळोवेळी मानसिक त्रास दिल्याने,त्या त्रासास कंटाळुन निरंजन यांनी लोणावळा येथील अन्नपुर्णा लॉज येथे जावुन गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे),पोलीस निरीक्षक, एस.एस.शिंदे ८३८००७१९६२ |

## दि.१५/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १६९/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ३९ वर्षे,रा.आंबेगाव-बुद्रुक,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०७/२०१९ रोजी २१/३५ वा.शुभारंभ लॉन्स जवळ,डी.पी.रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे पती सोबत साखरपुडयाचा कार्यक्रमाहुन त्यांचे पार्क केलेल्या गाडी जवळ जाण्यासाठी पायी चालत असता,रस्त्याचे कडेला उभे असलेल्या एका बसचे पाठीमागे अंधारातुन,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ३०,०००/- रु किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. घोडके ९०११११५६६६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २८९/१९,भादविक ३९९,महा.पो.का.क.३७(१),आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | राहुल शिंगे, पो.शि. लष्कर पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | १)युसुफ अब्दुल रज्जाक शेख,वय-३५ वर्षे,रा.सर्व्हे नं.४२,मिठानगर,कोंढवा,पुणे २)अब्रार अफजल खान,वय-१८ वर्षे,रा.सर्व्हे नं.४२,मिठानगर,कोंढवा,पुणे ३)शहादाब मुनिर खान,वय-१९ वर्षे,रा.बी.८९,मिठानगर,कोंढवा,पुणे ४)फैजअली महेबूब शेख,वय-१९ वर्षे,रा.घर नं.८ लेन नं.१,ग्रीनपार्क,कोंढवा बु//,पुणे ५)सैफअली महेबूब शेख,वय-१८ वर्षे,रा.सदर ६)कदीर नबी लाल शेख,वय १८ वर्षे,रा.सर्व्हे नं.६ गल्ली नं.२,कोंढवा पुणे ७)आजीम अब्दुल माजीद शेख,वय-१८ वर्षे,रा.घर नं.५ गल्ली नं.१,कोंढवा,पुणे ८)राहील अफरोज शेख,वय-१८ वर्षे,रा.घर नं.१३ गल्ली नं.६,मिठानगर,कोंढवा,पुणे (अटक) व इतर एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०७/२०१९ रोजी रात्रौ २२/३० वा.चे सुमारास महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक शॉप नं.२१५,एम. जी.रोड,कॅम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे एक रामपुरी चाकू, एक तलवार, एक दोरी, इत्यादी घातक शस्त्रे बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन, हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचेतयारीत असताना अ.क्र.१ ते ८ हे मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सी.एम.सुर्यवंशी ९४०५६६७४२३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ४८९/१९,भादविक ३५३,३६३,३२३,५०४,५०६(१) |
| **फिर्यादी** | एस.एस.तनपुरे, पो.ना.सिंहगड रोड, पो.स्टे. पुणे शहर |
| **आरोपी** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०७/२०१९ रोजी रात्रौ २०/४० वा.चे सुमारास हॉटेल निखारा जवळ,सिंहगड रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सहका-यांसह नमुद ठिकाणी अभिरुची मार्शल कर्तव्यावर हजर असताना,यातील नमुद इसमांनी त्यांचे ताब्यातील कार हिचेवर पाठीमागील बाजुस नंबर प्लेट नसताना संशईतरित्या कार मध्ये बसले असताना,फिर्यादी यांनी त्यांची खात्री करण्यासाठी अभिरूची पोलीस चौकी येथे घेवुन जाण्यासाठी सांगत असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादीस धक्का-बुक्की व शिवीगाळ करून,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात |

अडथळा निर्माण केला. तसेच फिर्यादी हे त्यांना समजावुन सांगुन त्यांचे गाडीत बसवुन अभिरूची चौकीस घेवुन येत असताना,त्यांनी कार चौकीस न घेता,कार प्रयेजा सिटी मार्गे पुणे-मुंबई हायवे रोडने घेवुन,फिर्यादी यांना अपशब्द वापरून,त्यांना हाताने मारहाण करून,ब्रीजवरून खाली टाकण्याची व त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. त्यानंतर फिर्यादी यांची शुटींग करून,त्यांना परत बावधन येथे सोडुन दिले. सदर प्रकारानंतर फिर्यादी यांनी मार्शला फोन करून पोलीस स्टेशनला येवुन फिर्यादी दिली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. शिवदास गायकवाड ९८२३७११७१८

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**